SES'S L. S. Raheja College of Arts & Commerce
Inward No.: 246
Date: 21/7/2023
Clerk
Principal

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी)
जुलै-ऑगस्ट २०२३ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत

# प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) दि. १८/०७/२०२३ ते दि. ०१/०८/२०२३ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा दि. १८/०७/२०२३ ते दि. १०/०८/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे तथापि राज्यातील काही जिल्ह्यामध्ये दि. २०/०७/२०२३ रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

सबब माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षेतील वेळापत्रकामध्ये दि. २०/०७/२०२३ च्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात येत असून तो खालीलप्रमाणे आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी)

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला दिनांक | वेळापत्रकाबाबत सुधरित तपशिल |
|---|---|
| वार व दिनांक, सत्र व वेळ | वार व दिनांक, सत्र व वेळ |
| गुरूवार, दि.२० जुलै २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते २.००<br>या दिवशी असलेले सर्व विषयांचे पेपर | बुधवार दि. ०२ ऑगस्ट २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते २.००<br>या दिवशी घेण्यात येतील |

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी)

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला दिनांक | वेळापत्रकाबाबत सुधरित तपशिल |
|---|---|
| वार व दिनांक, सत्र व वेळ | वार व दिनांक, सत्र व वेळ |
| गुरूवार, दि.२० जुलै २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते २.००<br>या दिवशी असलेले सर्व विषयांचे पेपर | शुक्रवार दि. ११ ऑगस्ट २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते २.००<br>या दिवशी घेण्यात येतील |
| गुरूवार, दि.२० जुलै २०२३<br>दुपार सत्र ०३.०० ते ६.००<br>या दिवशी असलेले सर्व विषयाचे पेपर | शुक्रवार दि. ११ ऑगस्ट २०२३<br>दुपार सत्र ०३.०० ते ६.००<br>या दिवशी घेण्यात येतील |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटक यांनी नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे -४.